RESEARCH FRONT
ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# बालशिक्षण हक्क कायदा २००९

**प्रा. चाकोते प्रविण शामसुंदर**
सहाय्यक प्राध्यापक,
श्री. म. ता. शासकीय अध्यापक
महाविद्यालय, कोल्हापूर.

शिक्षण हक्क कायदा २००९ साली संसदेने संमत केला आणि तो १ एप्रिल २०१० पासून लागू झाला. ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळावे. हे बाल शिक्षण हक्क कायद्याचे उदिष्ट आहे.

६ ते १४ वर्षे वयोगटातल्या सर्व मुलांना जवळच्या सरकारी शाळेत प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ते ८वी) पूर्ण होई पर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क आहे.

बालशिक्षण हक्क कायदा मुलांच्या शिक्षणाप्रती हक्काचा दृष्टीकोन दर्शवितो. मुलांचा अधिक अधिक विकास व्हावा हेच या हक्काधारीत दृष्टीकोनाचे उद्दिष्ट आहे. यामुळे स्व:ताच्या हक्काबाबत जागृक असलेले आणि आपले हक्क मागण्याची कौशल्ये आणि क्षमता असलेले नागरीक त्यातून घडायला मदत होईल.

**बाल शिक्षण हक्क**

बालकांना बालस्नेही (Child Friendly) वातावरणामध्ये सहज व सोप्या पध्दतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी अधिनियम व नियमावलीमध्ये विविध तरतूदींचा समावेश करण्यात आला आहे.

(१) **नि:शुल्क प्रवेश व शिक्षण (कलम ३)** या अधिनियमामुळे बालकाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्याच्याकडून कोणत्याही प्रकारची फी घेता येणार नाही. बालकाला आपले प्राथमिक शिक्षण तो राहत असलेल्या परिसरात पूर्ण करण्याचा हक्क आहे.

(२) **वर्षभरात केंव्हाही प्रवेश (कलम १५ नियम १ व २)** प्रवेशाचा वाढीव कालावधी नवीन सत्र सुरू होण्याच्या दिनांकापासून पहिले सत्र संपण्यापूर्वीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत निश्चित केला आहे. बालकाला शाळेत वाढीव कालावधी पर्यंत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे. वाढीव कालावधीनंतरही बालकाला शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे.

(३) **बालस्नेही शिक्षण (कलम १७, २९)** बालस्नेही व आनंददायी शालेय वातावरणात बालकेंद्रित पध्दतीने प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा बालकाला हक्क आहे.

(४) **शिक्षणपुर्तता प्रमाणपत्र (कलम ३०)** बालकाने प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर 'प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र' मिळण्याचा त्याला हक्क आहे.

(५) **वयाचा पुरावा नसल्यास प्रवेश (कलम १४)** बालकाला शाळेत प्रवेश घेताना, त्याच्याकडे कोणताही पुरावा नसेल तरीही त्याला शळेत प्रवेश करण्याचा हक्क आहे.

(६) **शिक्षणातील सातत्य (कलम १६)** कोणत्याही बालकाला कोणत्याही वर्गात मागे ठेवता येणार नाही. तसेच त्याला शाळेतून काढता येणार नाही.

(७) **हक्काचे संरक्षण (कलम ३१ व ३२, नियम २४ (१)** बालकांना प्रदान करण्यात आलेल्या हक्कांना संरक्षण मिळण्याचा त्याला हक्क आहे. याकरीता बालक राज्य बालहक्क संरक्षण आयोग यांनी बालकांसाठी सुरू केलेल्या हेल्पलाईनच्या मदतीने विद्यार्थी किंवा पालक तक्रार नोंदवू शकतो.

(८) **चाळणी परीक्षेशिवाय प्रवेश (कलम १३)** अधिनियम लागू होण्यापूर्वी बऱ्याच शाळांमध्ये मुलाखती, लेखी परीक्षा इत्यादी द्वारे चाळणी परीक्षा घेवून प्रवेश दिला जात असे. या अधिनियमांमुळे कोणत्याही चाळणी परीक्षेशिवाय शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.

(०९) **वयानुसार प्रवेश व शिक्षण (कलम ४, नियम ३ (२)** बालकाचे वय सहा वर्षापेक्षा अधिक असेल तर मात्र त्याने अद्याप कोणत्याही शाळेत प्रवेश घेतला नसेल तर वयानुसार योग्य त्या वर्गात प्रवेश घेण्याचा हक्क आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

(१०) **दाखला हस्तांतरण (कलम ५)** बालक शिकत असलेल्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची सोय नसल्यास नजीकच्या शाळेत शिक्षण घेऊ शकतो. त्या वेळी त्याला विनाविलंब दाखला मिळण्याचा हक्क आहे.

**बालशिक्षण हक्क कायद्याचे महत्व**

घटनेच्या कलम २१ 'क' चा विचार केला की या कायद्याचे महत्व लक्षात येते.

देशातील ६ ते १४ वयोगटाच्या प्रत्येक बालकाला किमान प्राथमिक शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क आहे. शिक्षक, पालक, शाळा, समाज, शासन, स्थानिक प्राधिकरण, शैक्षणिक प्रशासन, बालकांचे मातापिता/पालक, समाज यापैकी कोणीही ते हक्क हिरावून घेऊ शकत नाही. मोफत शिक्षण वयाच्या १४ वर्षापर्यंत मिळायला हवे. ही जबाबदारी सर्वांची आहे.

अनेक बालके विविध कारणांनी शाळेत दाखल होत नाहीत. काही मध्येच शाळा सोडून जातात. शारीरिक व्यंग–अपंगत्व, अध्ययन साहित्य अभाव, मुलींच्या बाबतीत असुरक्षिततेची भावना, शाळेत स्वच्छतागृहांच्या सुविधांचा अभाव यामुळे प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहू नयेत. कोणतेही बालक शाळेबाहेर/शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर राहता कामा नये यावर भर दिला आहे.

वर्गवातावरण मनमोकळे असावे. मुक्तपणे संवाद घडावेत. स्नेहपूर्ण वातावरण हवे. अध्यापन बालक केंद्रित हवे असे सुचविले आहे. बालक केंद्री अध्यापन, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा अंतर्भाव या कायद्यात केला आहे. आकारिक मूल्यमापनातून बालकांच्या सर्वांगिण विकासाकडे व संकलित मूल्यमापनातून त्यांच्या गुणवत्ता विकासाकडे सातत्याने लक्ष देणे ही आपली जबाबदारी आहे. विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे शिक्षण उशिरा प्रवेश घेतलेल्या बालकांचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणे या गोष्टींना महत्व दिले आहे.

राज्यशासनाने या कायद्याचा अंम्मलबजावणीची जबाबदारी सर्व घटकांवर टाकली असली तरी त्यामध्ये समाज व पालकांची भूमिका अधिक महत्वाची वाटते. बालकाचे व्यक्तिमत्व हे घर, परिसर व शाळा या माध्यमातून आकारास येत असते. शाळा ही बालक घडणीस जबाबदार आहेच. अनुत्तीर्ण कोणासही घोषित करता येणार नाही. पुढील वर्षात प्रवेश देण्यात यावा. संपादणूक पातळी वाढवावी. अपेक्षित अध्ययन क्षमता संपादणुकीतील अडचणी दूर करण्यासाठी कालबाह्य नियोजन करावे. संपादणूक न आढळल्यास शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा विरूध्द कारवाई करावी असे या अधिनियमात म्हटले आहे.

**सारांश**

शिक्षणाच्या प्रवाहात सर्व विद्यार्थ्यांचा विकास साधला जाणे आवश्यक आहे. या दृष्टीने बाल शिक्षण हक्क कायद्यातील तरतूदी महत्वपूर्ण व पायाभूत आहेत. यातील उणीवांवर मात करून त्याची सामर्थ्याने अंम्मलबजावणी करणे ही शिक्षणप्रवाहातील सर्वांचीच अर्थात शिक्षक, मुख्याध्यापक, पालक शिक्षणतज्ञ व विद्यार्थी या सर्वांचीच जबाबदारी ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

(१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम (२००९) मार्गदर्शिका.
(२) बाल स्नेही शिक्षण महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, पुणे – ३०.
(३) Internet
http://mhrd.gov.in/rte
www.rtemaharashtra.org.